**विकास योजना -परभणी (सु. + वा.क्षे.)**
मौजे परभणी स.क्र. ५३ मधील आ.क्र. ४/०८"कृषी उत्पन्न बाजार समिती" हे आरक्षण वगळणेबाबत. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १२७(२) अन्वये आदेश...

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२,**
**दिनांक: २८/१२/२०२०**

**शासन निर्णय क्र. टिपीएस-३१२०/२६६/प्र.क्र.७१/२०२०/नवि-३०**

**शासन निर्णय :-** सोबतची अधिसूचना (मराठी व इंग्रजी) महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करावी.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

Veena More
Digitally signed by Veena More
DN: CN = Veena More, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Urban Development Department
Date: 2020.12.28 12:08:50 +05'30'

(वीणा मोरे)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत**

१) मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२) मा. मंत्री, नगर विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
३) मा. राज्यमंत्री, नगर विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
४) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-४०० ०३२.
५) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-४०० ०३२.
६) मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद/ विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई- ०३२.
७) मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-४०० ०३२.
८) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-४०० ०३२.
९) प्रधान सचिव (नवि-१) नगर विकास विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१०) संचालक (नगर रचना) तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**प्रति,**

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य पुणे.
२) विभागीय आयुक्त औरंगाबाद विभाग, ओरंगाबाद.
३) सहसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
४) जिल्हाधिकारी, परभणी
५) सहायक संचालक, नगर रचना, परभणी शाखा, परभणी.

(त्यांना कळविण्यात येते की, सोबतच्या अधिसूचनेच्या अनुषंगाने अधिप्रमाणित करण्यात यावयाच्या भाग नकाशाच्या पाच प्रती शासनास विहीत मार्गाने सादर करण्यात याव्यात.)

६) आयुक्त, परभणी महानगरपालिका, परभणी

७) व्यवस्थापक, शासकिय मुद्रणालय, औरंगाबाद.

/- त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची शासकीय अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या साधारण राजपत्राच्या भाग-१ औरंगाबाद विभाग, औरंगाबाद पुरवणी भाग १ मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी ५ प्रती या विभागास, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे व सहसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद, सहायक संचालक, नगर रचना, परभणी शाखा, परभणी, आयुक्त, परभणी महानगरपालिका, परभणी यांना पाठवाव्यात.

८) निवडनस्ती (नवि-३०).

# महाराष्ट्र शासन

**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक : २८/१२/२०२०**

**<u>अधिसुचना</u>**

*<u>महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६</u>*

**क्रमांक टिपीएस-३१२०/२६६/प्र.क्र.७१/२०२०/नवि-३०**

ज्याअर्थी, परभणी शहराची सुधारित अधिक वाढीव क्षेत्राची विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे) चे कलम ३१ अन्वये, नगरविकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-३१९९/ १३०/प्र.क्र.३३/९९/ नवि-३०, दि.३०/९/१९९९ अन्वये भागशः मंजूर केली असून ती दि.१६/१२/१९९९ पासून अंमलात आली आहे.तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना (सुधारीत अधिक वाढीव क्षेत्र) . टिपीएस- ३१९९/ १३०/प्र.क्र. १११-ए/२००१/ नवि-३०, दि. २४/०८/२००१ अन्वये मंजूर केली असून ती दि.१६/१०/२००१ पासून अंमलात आली आहे (यापुढे "उक्त विकास योजना" असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये, मौ.परभणी , तालुका व जिल्हा परभणी, येथील सर्व्हे नं.५३ चे सात बारा उता-यानुसार एकूण क्षेत्र १२.०१ हे. (यापुढे "उक्त जमीन " असा उल्लेख केला आहे.) असून त्यापैकी भागशः क्षेत्र उक्त विकास योजनेनुसार "आ.क्र.४/०८-कृषी उत्पन्न बाजार समिती" या प्रयोजनासाठी आरक्षित आहे. (यापुढे "उक्त आरक्षण " असा उल्लेख केला आहे.) .

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाचे समुचित प्राधिकरण कृषी उत्पन्न बाजार समिती असून (यापुढे "उक्त समुचित प्राधिकरण" असा उल्लेख केला आहे):

आणि ज्या अर्थी , उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त जमीनीवरील उक्त आरक्षणाने बाधित जमीन विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून दहा वर्षाच्या आत संपादित केलेली नाही ;

आणि ज्याअर्थी, मौ.परभणी , तालुका व जिल्हा परभणी, येथील सर्व्हे नं.५३ चे सात बारा उता-यानुसार तीन सहहिस्सेदार असून त्यापैकी एक सहहिस्सेदार श्री. अनंत नारायणराव फुटाणे यांचे सात -बारा उता-यानुसार ५.६६ हे. क्षेत्र आहे. श्री. अनंत नारायणराव फुटाणे यांनी उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) नुसार, नियोजन प्राधिकरण असलेल्या परभणी महानगरपालिकेवर आणि उक्त समुचित प्राधिकरणावर दि.१२/०१/२०१६ रोजीच्या अर्जान्वये सूचना बजावून देखील उक्त समुचित प्राधिकरणाने दोन वर्षाच्या कालावधीत, उक्त जमीन संपादन केली नाही अथवा ती संपादन करण्यासंबंधीची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६(४) सह भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ ची भूसंपादनाची अधिसूचना विहित मुदतीत प्रसिध्द केली नाही;

आणि ज्याअर्थी, मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने, मौ.परभणी , तालुका व जिल्हा परभणी, येथील सर्व्हे नं.५३ या जमिनीचे सहहिस्सेदार श्री अनंत नारायणराव फुटाणे यांनी दाखल केलेल्या रिट याचिका क्र.६९९७/२०१९ मध्ये दि.३१/०१/२०२०रोजी पारित केलेल्या आदेशान्वये उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झाले असून त्यानुषंगाने उक्त आरक्षण उक्त जमिनीवरून व्यपगत झाल्याबाबतची अधिसूचना निर्गमित करण्याबाबत शासनास आदेशित केलेले आहे;

आणि ज्याअर्थी , उक्त जमिनीच्या तीन सहहिस्सेदारांपैकी केवळ श्री अनंत नारायणराव फुटाणे यांनी उपरोक्त नमूद केल्यानुसार उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) नुसार, नियोजन प्राधिकरण असलेल्या परभणी महानगरपालिकेवर आणि उक्त समुचित प्राधिकणावर दि.१२/०१/२०१६ रोजीच्या अर्जान्वये सूचना बजावली असल्याने , तसेच उपरोक्त नमूद केलेल्या रिट याचिका क्र.६९९७/२०१९ मध्ये वादी म्हणून केवळ श्री अनंत नारायणराव फुटाणे यांचेच नाव असल्याने , मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक ३१/१/२०२० रोजीच्या आदेशानुसार श्री अनंत नारायणराव फुटाणे यांच्या स. क्र. ५३ मधील ५.६६ हे . क्षेत्रापैकी उक्त आरक्षणाने बाधित क्षेत्रावरील आरक्षण व्यपगत ठरते.

आणि ज्याअर्थी, उक्त प्रकरणी, मा.उच्च न्यायालयाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर तसेच परभणी महानगरपालिकेचे व सह संचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचे अहवाल विचारात घेता असे दिसून येते की, वरीलप्रमाणे उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) अन्वये नोटीस बजावल्यापासून, उक्त समुचित प्राधिकरणाने दोन वर्षाच्या कालावधीत उक्त जमिनीपैकी उक्त आरक्षणाने बाधित क्षेत्राच्या जमिनीचे संपादन केले नाही अथवा सदर बाधित क्षेत्राच्या जमिनीचे संपादन करण्यासंबधीची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (४) सह भूसंपादन, पूनर्वसन व पुर्नवसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ ची भूसंपादनाची अधिसूचना विहित मुदतीत प्रसिध्द केलेली नाही. त्यामुळे या परिस्थितीत उक्त अधिनियाचे कलम १२७(१) मधील तरतूदीनुसार स. क्र. ५३ मधील श्री अनंत नारायणराव फुटाणे यांच्या ५.६६ हे . क्षेत्रापैकी उक्त आरक्षणाने बाधित क्षेत्रावरील आरक्षण व्यपगत झाले असल्याचे शासनाचे मत झाले आहे;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियामचे कलम १२७(२) नुसार प्राप्त अधिकारात राज्य शासन परभणी महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील (सुधारीत अधिक वाढीव क्षेत्र) "आ.क्र.४/०८- कृषी उत्पन्न बाजार समिती" हे आरक्षण भाग नकाशात दर्शविल्याप्रमाणे , मौ.परभणी तालुका व जिल्हा परभणी येथील स. क्र. ५३ मधील श्री अनंत नारायणराव फुटाणे यांच्या ५.६६ हे . क्षेत्रापैकी उक्त आरक्षणाने बाधित क्षेत्रापुरते आरक्षण व्यपगत झाल्याचे अधिसूचित करीत आहे व अशाप्रकारे आरक्षणातून मुक्त झालेली जमीन या संबंधित जमीन मालकास उक्त विकास योजनेतील लगतच्या अनुज्ञेय भूवापराप्रमाणे अनुज्ञेय असलेल्या विकासाकरीता उपलब्ध होईल;

प्रस्तुत आदेशान्वये उक्त आरक्षणांमधून व्यपगत झालेले क्षेत्र दर्शविणाऱ्या भाग नकाशाची प्रत आयुक्त, परभणी महानगरपालिका, परभणी यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या कालावधीसाठी ठेवण्यात आली आहे.

सदरचे आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदे / नियम) या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,**

Veena More

Digitally signed by Veena More
DN: CN = Veena More, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Urban Development Department
Date: 2020.12.28 12:09:11 +05'30'

(वीणा मोरे)

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

# <u>Government of Maharashtra</u>

**Urban Development Department**
**Mantralaya, Mumbai 400 032.**
**Dated: -28/12/2020**

## <u>NOTIFICATION</u>

***<u>The Maharashtra Regional & Town Planning Act, 1966</u>:***

**No. TPS-3120/266/C.R.71/2020/UD-30**:- Whereas, the Development Plan of Parabhani City( Revised plus Extended Area), Dist- Parabhani has been partly sanctioned by the Government under section 31 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") vide Notification No. TPS 3199/ 130/C.R..33/99/ UD-30, Dated 30/9/1999 and has come into force with effect from dt. 16/12/1999. And whereas the Development Plan for the Excluded part (Revised plus Extended Area) has been sanctioned by the Government vide Notification No. TPS 3199/ 130/C.R. 111-A/2001/ UD-30, dated 24/08/2001 and has come into force with effect from dt. 16/10/2001. (hereinafter referred to as "the said Development plan");

And whereas, in the said Development Plan, the land bearing S.No. 53 of Mouje Parbhani, Taluka and Dist-Parbhani , having total area of 12.01 H. as per the 7/12 extract (hereinafter referred to as “the said land”), is partly reserved for “Site.No.4/08- Agricultural Produce Market Committee” (hereinafter referred to as “the said Reservation”);

And whereas "Agricultural Produce Market Committee " is the Appropriate Authority for the said Reservation. (hereinafter referred to as “the said Appropriate Authority”);

And whereas, out of the said land , the land affected by the said Reservation, has not been acquired by the said Appropriate Authority within ten years from the date on which the said Development Plan came into force;

And whereas , as per the 7/12 extract of the said land , there are three co-owners of the said land ,and one of the co-owners , Shri Anant Narayanrao Phutane having area admeasuring 5.66 H. as per 7/12 extract ,served the notice dated 12/01/2016 under section 127(1) of the said Act , on the Parabhani Municipal Corporation And the said Appropriate Authority. Even after service of the said Notice as aforesaid, the said land had neither been acquired, nor the Notification of land acquisition required under Section 126 (4) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 read with Section 19 of the Right to Fair Compensation of Transparency in Land Acquisition, Rehabilitation & Resettlement Act, 2013, has been published by the said Appropriate Authority, within prescribed time period from the date of the service of said Notice under sub-section (1) of section 127 of the said Act;

And whereas, the Hon’ble High Court, Aurangabad Bench, in Writ Petition No-6997 of 2019 filed by one of the co-owners of the said land, Shri Anant Narayanrao Phutane ,vide its order, dated 31/01/2020, has held that the said Reservation, on the said land stands lapsed and directed the State of Maharashtra to notify the lapsing of the said Reservations on the said land;

And whereas , out of the three co-owners of the said land , only Shri Anant Narayanrao Phutane ,served the notice dated 12/01/2016 under section 127(1) of the said Act , on the Parabhani Municipal Corporation And the said Appropriate Authority. Also Shri Anant Narayanrao Phutane is the sole petitioner in the writ petition no. 6167 /2019. And so, as per the order dated 31/01/2020 in the writ petition 6997 of 2019 , the said Reservation on the land out of the land of the petitioner admeasuring 5.66 h., stands lapsed.

And whereas after receiving the Hon'ble High Court Order and the Report of the Parbhanai Municipal Corporation and the Report of the Joint Director of Town Planning, Aurangabad Division, Aurangabad, it is observed that the land affected by the said Reservation out of the said land , had neither been acquired within the prescribed time limit from the date of service of Notice, nor Notification of land acquisition required under Section 126 (4) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 read with Section 19 of the Right to Fair Compensation of Transparency in Land Acquisition, Rehabilitation & Resettlement Act, 2013, been published within the prescribed time limit by the said Appropriate Authority. And, in consequence thereof, the Government of Maharashtra is of opinion that the said reservation on the land of Shri Anant Narayanrao Phutane bearing S.No. 53 admeasuring 5.66 h. stands lapsed as per the provisions of Section 127 (1) of the said Act;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (2) of section 127 of the said Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby notifies that the said Reservation i.e "Site.No.4/08- Agricultural Produce Market Committee" on the land of Shri Anant Narayanrao Phutane bearing S.No. 53 of Mouje Parbhani, Taluka and Dist-Parbhani admeasuring 5.66 h, stands lapsed ,as shown on plan, and the land so released, will be available to the Owner for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said Development Plan

A copy of the Part Plan, showing the area of the said Reservation which has been lapsed vide this Order, is available in the office of the Municipal Commissioner, Parbhani Municipal Corporation, Dist. Parbhani, during office hours on all working days for inspection of public for the period of One month.

This Order shall also be published on the Govt. website www.maharashtra.gov.in (Acts/ Rules).

**By order and in the name of the Governor of Maharashtra,**

Veena More

Digitally signed by Veena More
DN: CN = Veena More, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Urban Development Department
Date: 2020.12.28 12:09:34 +05'30'

(Veena More)
**Under Secretary to Government**